**खटला क्र.१४८/पी.एस./२०२२ नि. क्र.— २ सलग**

**अभियोगपक्षा तर्फे साक्षीदार क्र. १ याची जबानी.**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :—**

**माझे नांव :— रामदास वामन कोळेकर ,**

**वय :— ३५ वर्षे,**

**व्यवसाय :— पोलिस शिपाई, बक्कल क्रमांक १२०९, वाई पोलिस ठाणे, जि. सातारा.**

**राहणार :— वाई, जि. सातारा.**

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती एम.एम. गाडे यांचेकडुन</u>**

०१. दि.१५.०७.२०२१ रोजी मी वडाळा पोलीस ठाणे येथे पोलिस शिपाई या पदावर कार्यरत होतो. दिनांक १८.०७.२०२१ रोजी माझे कर्तव्य मोबाईल गस्ती वाहनावर होते. माझे सोबत पोलिस नाईक पडवळकर, महिला पोलिस शिपाई जगताप कर्तव्यावर होते. आम्ही तिघे पोलिस ठाणे हद्दीमध्ये गस्त घालत होतो. दक्षिण नियंत्रण कक्षाकडून आम्हाला संदेश प्राप्त झाला की, ईस्टर्न फ्री वे वर अपघात झाला आहे, जखमीला मदत करा. आम्ही तेथे गेलो. आम्हाला एक बुलेट, एक जखमी तेथे पडलेला दिसून आला. ईस्टर्न फ्री वे च्या उत्तर वाहिनेला उतरणीला ते आम्हाला दिसून आले.

०२. जखमी इसमा शेजारी आम्हाला एक इसम दिसून आला. जखमी इसमाला आम्ही तात्काळ मोबाईल व्हॅनमध्ये टाकून सायन हॉस्पिटल येथे नेले. जखमी इसमा सोबतच्या इसमाचे नाव विचारले. त्याने त्याचे नाव राकेश रमेश पिचकारण असे सांगितले. राकेश रमेश पिचकारण याने आम्हाला दवाखान्यात जात असताना जखमी इसमाचे नाव व्यंकटेश कुपन अरीजन असे सांगितले. राकेशने पुढे सांगितले की, राकेश बुलेट गाडी चालवित होता, व्यंकटेशन मागे बसला होता, गाडी स्लीप झाली, व्यंकटेशच्या डोक्याला मार लागला. आम्ही त्याला दवाखान्यात नेले.

०३. राकेशने जखमीच्या नातेवाईकांना कळवले. आम्ही नंतर वडाळा पोलिस ठाणे येथे गेलो. मी झालेली हकीकत पोलिस ठाणे अंमलदार यांना सांगितली. त्यांनी लिहून घेवून ते टाइप केले. त्यांनी मला त्याची प्रत दाखवली. ती माझे सांगणेप्रमाणे मुद्रित केली होती. मला आता प्राथमिक खबरी अहवाल दाखवण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर माझया सांगण्याप्रमाणे नमूद आहे. त्यास आता निशाणी क्रमांक पी.१/पी.डब्ल्यू.१ देण्यात आला. मी राकेशला ओळखू शकतो. राकेश आज न्यायालयात हजर नाही. त्या बुलेट गाडीचा नोंदणी क्रमांक एम.एच.—०१—डी.डब्ल्यू.—१५५७ असा होता. ईस्टर्न फ्री वे वर दुचाकीस बंदी आहे. पोलिस उप—निरीक्षक सचिन खरात आणि दोन पंच यांना मी घटनास्थळ त्याच दिवशी संध्याकाळी ८.०० वाजणेचे सुमारास दाखवले. त्यांनी माझे समक्ष पंचनामा केला.

**आरोपी व आरोपीचे विधिज्ञ गैरहजर. सबब, उलटतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

सही/—

**( आर. एस. वानखेडे )**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**२९वे न्यायालय, दादर, मुंबई.**

**दिनांक :— ०३.०८.२०२६.**